सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र .०२२-२२७९३०५५/०२२-२२७९३३८१

Email ID : dofa.wrd@maharashtra.gov.in

---

**ईमेलद्वारा**

क्र.- संकीर्ण २०२०/( प्र.क्र.९४ /२०२० )/आ(क्षेप्र)                दिनांक :- 27 /०४/२०२२

प्रति,

१. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान संशोधन व सुरक्षा नाशिक
२. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे/ गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद / तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव / महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे /विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
३. मुख्य अभियंता, जलविद्युत, (विद्युत), मुंबई
४. मुख्य अभियंता, (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक
५. मुख्य अभियंता (स्थापत्य) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे
६. मुख्य अभियंता तथा मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, म.रा.औरंगाबाद
७. अधीक्षक अभियंता व प्राचार्य महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षक संस्था, नाशिक (मेटा)
८. अधीक्षक अभियंता व सह संचालक, महा.अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक (मेरी)
९. अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक (SLTC)
१०. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे संशोधन विकास संस्था, पुणे
११. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे /नागपूर/औरंगाबाद/ अमरावती. पुणे
१२. अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद कक्ष, पुणे
१३. अधीक्षक अभियंता व सचिव, आंतरराज्य नियंत्रण मंडळ, नागपूर
१४. प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे

**विषय :- राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ** :- (१) वित्त विभागाचे क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.३४/सेवा-४, दि. २४/०२/२०२२ रोजीचे पत्र व सोबतची सहपत्रे

(२) या विभागाची समक्रमांकाची दि.२४/१०/२०२०, दि. १०/०२/२१ रोजीची पत्र, दि. ०५/०१/२०२१ रोजीचे अशापत्र, व.दि. ०५/०३/२०२१ रोजीचे शासन परिपत्रक

महोदया / महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.१ येथील पत्र पहावे तसेच सदर पत्रासोबत जोडलेली केंद्र शासनाचे दि. ०७ जानेवारी २०२२ रोजीचे पत्र, वित्त विभागाचे दि. २७/१०/२०२१ रोजीचे अ.शा. पत्र व केंद्र शासनाचे दि. ०६/०९/२०२१ रोजीचे पत्र इत्यादी कागदपत्रे पहावीत. तसेच यासोबतचे NPS अंमलबजावणी संदर्भात येणाऱ्या त्रुटींचे निराकारण होण्याच्या अनुषंगाने १३ मुद्यांबाबतचे विवरणपत्र आपणांस इमेल वर पाठविण्यात येत असून त्याचेही अवलोकन करावे.

२. याबाबत नमूद करण्यात येते की, जलसंपदा विभाग शासन परिपत्रक ०३/१२/२०१६ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची अंशदाने राष्टीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये जमा करण्यासंदर्भातील सूचना देण्यात आल्या आहेत व शासन पत्र दि. १८/०३/२०१७ अन्वये सदरची कार्यवाही सेवार्थ प्रणालीतून करण्यासाठी ३३ जिल्ह्यांसाठी आहरण व संवितरण अधिकारी प्राधिकृत करुन त्यांना कार्यवाही विहित केली आहे. तसेच NPS योजनेतील कर्मचाऱ्यांना अंशदाने वेळेवर जमा होतील आणि सेवासमाप्तीनंतर त्यांचे लाभ वेळेत मिळतील या अनुषंगाने येणाऱ्या त्रुटींचे निराकरण होण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना आंपणांस यापूर्वी संदर्भ क्र. २ येथील नमूद पत्र, अ.शा.पत्र व शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.तसेच या विषया संदर्भात वित्त विभागाकडूनही वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे

४. **या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील पत्रासोबतचे दि. २७/०१०/२०२१ च्या पत्रान्वये वित्त विभागाने दिलेल्या सूचनांकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.** सदर पत्राच्या अनुषंगाने व यापूर्वी आपणांस पाठविण्यात आलेल्या सं.क्र. २ येथील नमूद पत्र, अ.शा.पत्र व शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने राष्ट्रीय निवृत्ती योजनेंतर्गत जलसंपदा विभागाच्या अधिनस्त ५ महामंडळांच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सभासद नोंदणी, अंशदान बँकेकडे जमा होण्यास लागणारा विलंब, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना परतावा देण्याबाबत होणारा विलंब इत्यादी मुद्यांबाबत येणाऱ्या अडचणीसंदर्भात योग्य ती उपाययोजना करुन त्याचे निराकरण करावे व त्याबाबतचा अहवाल निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PERDA) यांना सादर करावा, ही आपणांस विनंती आहे

वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपली,

27/4/22

(यमुना जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत :- (१) नियंत्रक अधिकारी (कस्टमाईज्ड सेवार्थ प्रणाली) तथा अधिक्षक अभियंता, अधीक्षक अभियंता, ई-प्रशासन पुणे

- उपरोक्त पत्रातील विषयाच्या अनुषंगाने शासनपत्र क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२/आक्षेप्र,दिनांक ३१ जानेवारी २०२२ च्या संदर्भात उचित कार्यवाहीसाठी

(२) समन्वय अधिकारी (कस्टमाईज्ड सेवार्थ प्रणाली) उपसचिव (लपा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(३) अवर सचिव (सेवा -४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

(३) कार्यासन आ (क्षेप्र) संग्रहार्थ